बहादुर बहिणी

अमेरिकन महिला ज्यांनी इतिहास घडवला

बहादुर बहिणी

अमेरिकन महिला ज्यांनी
इतिहास घडवला.

लेखिका : योना झेल्दिस मॅक्डोना
चित्रे : मलका झेल्दिस
मराठी अनुवाद : सानिया व तृप्ती

अनुक्रमणिका

लेखिकेचे मनोगत

पोकाहोंटस

हॅरिएट टबमॅन

एलिझाबेथ कॅडी स्टँटन आणि सुझान बी अँथनी

क्लारा बार्टन

एमिली डिकिन्सन

मेरी कॅसट

हेलन केलर

एलेनॉर रूझवेल्ट

ॲमेलिया इयरहार्ट

मार्गारेट मीड

लेखिकेचे मनोगत

अमेरिकेतील महत्वाच्या महिलांविषयी माहिती शोधणे आणि लिहिणे हे काम जसे अवघड होते तसेच अतिशय प्रेरणादायीदेखील. अवघड या अर्थी की अनेक महत्वपूर्ण योगदान दिलेल्या महिलांमधून केवळ अकरा जणींना निवडणे फारच आव्हानात्मक होते. पण या महिलांच्या काळजाला भिडणाऱ्या कहाण्या अतिशय प्रेरणादायी होत्या.

हे पुस्तक अनेक कर्तबगार महिलांच्या आयुष्याची झलक दाखवते. ॲमेलिया इअरहार्ट अतिशय साहसी होती. जगाला प्रदक्षिणा घालायचे स्वप्न साकार करण्याची धडपड करण्यात तिचे आयुष्य व्यतीत झाले. याच्या बरोबर विरुद्ध होते एमिली डिकिन्सनचे एकांतात घालवलेले आयुष्य. जे घराच्या चार भिंतींमध्ये बंदिस्त असून देखील परिपूर्ण आणि प्रगल्भ होते. हॅरिएट टबमॅन आणि क्लारा बार्टनचे जीवन आपल्यासमोर मानव जातीच्या सेवेचा आदर्श ठेवते आणि मनुष्याच्या मुलभूत गरजांच्या पूर्ततेकडे लक्ष वेधते. या सर्व महिलांच्या जीवनकहाण्यांमध्ये प्रत्येकीची स्वतःची मुल्ये दिसून येतात.

या महिलांच्या गोष्टींमधून नेतृत्वक्षमता, मानवतावाद, आत्मसन्मान, सर्जनशीलता हे व असे अनेक गुण दिसून येतात. हे गुण माझ्या लहान-मोठ्या वाचकांना आकर्षित करतील आणि ते हे स्वतःमध्ये बिंबवण्याचा प्रयत्न करतील अशी मी आशा करते.

- योना झेल्दिस मॅक्डोना

पोकाहोंटस
(१५९५ – १६१७)

“तिचे करुणेने ओथंबलेले हृदय पाहून माझा तिच्याबद्दलचा आदर द्विगुणीत झाला.”

– कॅप्टन जॉन स्मिथने पोकाहोंटसवर लिहिलेल्या पुस्तकातून

पॉहॅटनला अनेक बायकांपासून अनेक मुले झाली असली तरी त्याची लाडकी लेक एकच होती-पोकाहोंटस. अल्गोन्कीयन लोकांचा प्रमुख असलेला पॉहॅटन एक ताकदवान आदिवासी नेता होता. ज्याला आता व्हर्जिनिया म्हणून ओळखले जाते त्या प्रांतात ते राहायचे. पोकाहोंटस त्याची राजकन्या होती.

पोकाहोंटसच्या सुरुवातीच्या आयुष्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. पॉहॅटनच्या इतर मुलांप्रमाणे पोकाहोंटसला तिच्या जन्मानंतर आईच्या घरून वडिलांच्या घरी आणले गेले आणि तिथेच तिचे पालन पोषण केले गेले. अल्गोन्कीयन लोकांच्या सामान्य मुलींसारखी बागकाम, पाणी भरणे, सरपण गोळा करणे, शिवणकाम, जेवण बनवणे अशी कामे तिला कधीच करावी लागली नाहीत. दिवसातला जास्तीत जास्त वेळ ती नद्यांमध्ये डुंबण्यात आणि जंगलांमध्ये हुंदडण्यातच घालवायची. पोकाहोंटसचे खरे नाव मातोआका होते. पण तिला सगळे पोकाहोंटस म्हणत कारण पोकाहोंटसचा अर्थ आहे अतिशय खट्याळ आणि खेळकर. आणि ती अगदी तशीच होती.

पोकाहोंटस बारा वर्षाची असताना तिची चेसापेक किनाऱ्यावर उतरलेल्या इंग्रज वसाहतवाद्यांशी पहिल्यांदा भेट झाली. ते आपल्या लोकांना राहायला आणखी जागा मिळवण्यासाठी आणि त्यांच्या लोकरीच्या कोट आणि ब्लँकेटसाठी नवी बाजारपेठ शोधण्यासाठी आले होते. या नव्या दुनियेत भरपूर सोने आहे, ते आपण आपल्या मायदेशी घेऊन जाऊ असे त्यांना वाटत होते. १६०७ मध्ये त्यांनी जेम्सटाउन ही पहिली वसाहत वसवली ज्याचे नाव राजा जेम्स (पहिला) याच्या नावावरून ठेवण्यात आले होते. वसाहतीमध्ये एक व्यापारी केंद्र, एक चर्च, एक गोदाम आणि काही शाकारलेली घरे होती. इंग्रज तिथे कायमचा मुक्काम करायला आले होते हे त्याच्यावरून सिद्ध होत होते.

पॉहॅटन या इंग्रज वसाहतवाद्यांकडे संशयाने बघायचा. त्याला इंग्रजांचे काचेचे मणी आणि तांब्याची भांडी आवडायची. त्याने अनेक किलो

मक्याच्या बदल्यात ती मिळवली होती. त्याला त्यांच्या बंदुकीसुद्धा हव्याहव्याश्या वाटायच्या. पण त्याला सारखी भीती वाटायची की हे इंग्रज आपल्यावर हल्ला करतील आणि सगळी जमीन हिसकावून घेतील. पोकाहोंटसला मात्र या परदेशी पाहुण्यांबद्दल भारी कुतूहल वाटे. ती संधी मिळेल तेव्हा जेम्सटाउनला जायची. तिथेच तिची ओळख कॅप्टन जॉन स्मिथशी झाली. आणि लवकरच ते एकमेकांचे घट्ट मित्र झाले.

पोकाहोंटसने स्मिथला तिथली स्थानिक भाषा शिकवली आणि स्मिथने तिला इंग्रजीचे धडे दिले. वसाहतीतील लोकांना घरे शाकारताना आणि शेतीसाठी जमिनी साफ करताना बघणे हा तिचा आवडता छंद होता. तिला या परक्या लोकांबद्दल आपुलकी वाटू लागली. हळूहळू जेम्सटाउनमधले धान्याचे साठे संपू लागले. लोकांची उपासमार होऊ लागली. तेव्हा पोकाहोंटसने आपल्या जमातीतील लोकांची मनधरणी करून त्यांच्या मदतीने वसाहतीतील गोदाम धान्याने भरून दिले. तसेच धान्याचा व्यापार करणाऱ्या इतर आदिवासी जमातींची तिने स्मिथबरोबर ओळख करून दिली. तिच्यामुळे वसाहतीचे मृत्यू, दुष्काळ आणि अनागोंदीपासून रक्षण झाले. पोकाहोंटस ही त्यांच्यासाठी जीवनदायिनी ठरली. तिने स्मिथचा जीव सुद्धा वाचवला. पॉहॅटन स्मिथला ठार करण्याचे कारस्थान आखतो आहे हे जेव्हा तिला समजले तेव्हा तिने ताबडतोब वसाहतीत जाऊन स्मिथला सावध केले. केवळ पोकाहोंटसच्या प्रसंगावधानामुळेच स्मिथ आपला जीव वाचवू शकला.

पोकाहोंटसने इंग्रज आणि अल्गोन्कीयन लोकांमध्ये शांतता प्रस्थापित करण्याचे तळमळीने प्रयत्न केले. पण दिवसेंदिवस त्यांच्यातले संबंध अजूनच ताणले जात होते. जेव्हा तिच्या वडिलांनी साठ वसाहतवाद्यांची हत्या करण्याचा आदेश दिला तेव्हा ती घर सोडून उत्तरेकडे पोटोमॅक जमातीबरोबर राहायला गेली. काही दिवसांनी बरमुडाला जाताना रस्ता चुकलेला एक इंग्रज, कॅप्टन सॅम्युएल ॲर्गोल, पोटोमॅक लोकांच्या गावात येऊन थडकला. पोकाहोंटसने आनंदाने त्याचे स्वागत केले. आपले अपहरण करून मोठी खंडणी गोळा करण्याचा त्याचा हेतू आहे याची तिला पुसटशी देखील कल्पना नव्हती. त्याने दोन पोटोमॅक लोकांना फूस लावली आणि त्यांच्याकरवी पोकाहोंटसला आपल्या जहाजावर येण्याचे आमंत्रण दिले. ती आल्यावर त्याने तिला स्वादिष्ट भोजन दिले. पोकाहोंटसला इंग्रजाच्या ताब्यात देऊन पोटोमॅक लोक गुपचूप जहाजावरून पसार झाले.

पोकाहोंटसला एका इंग्रज अधिकाऱ्याच्या शेतावर नेण्यात आले. तिथे तिला तिच्या अल्गोन्कीयन कपड्यांऐवजी इंग्रजी पोशाख घालण्यास सांगितला. तिला ख्रिश्चन धर्माची दीक्षा देण्यात आली आणि तिचे नाव रिबेका ठेवण्यात आले. पण ॲर्गोलची योजना साफ अपयशी ठरली. पॉहॅटनने पोकाहोंटसच्या सुटकेसाठी कोणतेही प्रयत्न करण्याचे नाकारले. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्या लोकांनी पोकाहोंटसचे अपहरण केले होते तेच लोक तिला आवडू लागले. ते लोक खरंच तिला चांगली वागणूक देत होते. तंबाखूचा शेतकरी असलेल्या जॉन रॉल्फने जेव्हा तिला लग्नाची मागणी घातली तेव्हा तिने त्याला आनंदाने होकार दिला. पॉहॅटन पोकाहोंटसच्या लग्नाला गेला नाही. पण त्याच्या मनातली इंग्रजांविषयीची तेढ कमी झाली असावी कारण त्याने तिला लग्नाची भेट म्हणून एक सुंदर मोत्याचा हार आणि भरपूर जमीन दिली.

पुढच्या वर्षी पोकाहोंटसने थॉमस नावाच्या मुलाला जन्म दिला. थॉमस एक वर्षाचा झाल्यावर ते छोटे कुटुंब जहाजाने इंग्लंडला रवाना झाले. लंडनचे वैभव बघून पोकाहोंटसचे डोळे दिपून गेले. तिला राजवाड्यात येण्याचेही आमंत्रण मिळाले जिथे तिची महाराणी ॲनशी भेट झाली. इंग्लंडची दमट हवा मात्र तिला अजिबात सहन झाली नाही. ती आजारी पडली आणि दिवसेंदिवस अशक्त होत गेली. तब्येत ठीक नसून सुद्धा ती जहाजाने घरी जायला निघाली. पण अटलांटिक समुद्र पार करण्याआधीच तिची तब्येत खालावत गेली आणि तिला कळून चुकले की ती हा प्रवास पूर्ण करू शकणार नाही. आपल्या पतीला विनंती करून तिने जहाज जवळच्या किनाऱ्यावर थांबवायला सांगितले. तिला किनाऱ्यावरच्या एका विश्रामगृहात नेण्यात आले आणि तिथेच तिचा मृत्यू झाला.

ज्या तरुणीने आपल्या मातृभूमीवर शांतता नांदावी यासाठी अथक झुंज दिली तिला अखेर मृत्यूसमोर हार मानावी लागली. इंग्लंडमधील ग्रेवसँड येथे पोकाहोंटसचे दफन करण्यात आले.

हॅरिएट टबमॅन
(१८२० – १९१३)

“मी माझ्या हातांकडे पाहिलं..नक्की मी स्वतंत्र झाले आहे ना...सगळं इतकं सुंदर दिसत होतं. झाडांमधून आणि शेतामधून सूर्याची सोनेरी किरणं पसरली होती...वाटलं जणू काही मी स्वर्गातच आहे”

- हॅरिएट टबमॅनने पेन्सिल्वेनियाला पोचल्यावर काढलेले उदगार

मिसेस कुकनी मिंटीला लोकरीचा गोळा कसा गुंडाळायचा हे पुन्हा एकदा दाखवले. तसे अवघड काम होते ते. जर मिंटीची काही चूक झाली तर मात्र गोरी मालकीण तिला भरपूर मारायची.

मिंटी, तिचं खरं नाव अरमिंटा. तिचा जन्म मेरिलँडमध्ये एका गुलाम कुटुंबामध्ये झाला. तिचे आई-बाबा हॅरिएट ग्रीन व बेंजामिन रॉस दोघेही गुलाम होते. सहा वर्षाची असतानाच ती व तिच्या आई-बाबांचे मालक मिस्टर ब्रॉडस ह्यांनी तिला मिसेस कुककडे कामाला ठेवले होते. एवढ्या लहान वयातच तिला दिवसभर कष्ट करावे लागत. रात्री उब मिळावी म्हणून ती शेकोटीजवळ राखेत पाय ठेऊन झोपायची.

कुक कुटुंब तिच्यावर फारसे खुश नव्हते. मिंटी आजारी पडली तेव्हा त्यांनी तिला परत पाठवले. मग मिस्टर ब्रॉडसनी तिला मिस सुझानकडे बाळाला सांभाळण्यासाठी ठेवले. रात्री बाळाच्या रडण्याने मालकिणीची झोपमोड झाली की मालकीणबाई चिडायची आणि मिंटीला चांगला चोप द्यायची. एकदा मिंटीने मिठाईचा तुकडा चोरला. आता सुझानबाईचा मार खावा लागेल ह्या भीतीने ती दिवसभर डुक्करांच्या गोठ्यात लपून बसली. ती एकदाची परत आली पण ह्या वेळी मात्र मिस्टर ब्रॉडसनी तिला इतर कुणाकडे कामाला न पाठवता आपल्या शेतात काम करायला पाठवले.

शेतातले गुलाम काम करता करता आपापसात गप्पा मारायचे. ते इथून पळून जाऊन स्वतंत्र होण्याबद्दल बोलायचे. त्यांच्याकडून मिंटीने भुमिगत रेल्वे बद्दल ऐकले, जे गुलामांना मुक्त होण्यासाठी मदत करणाऱ्या लोकांच्या चळवळीचे नाव होते. तिथेच तिने गुलामगिरी नष्ट करण्यासाठी चळवळ उभारलेल्या नॅट टर्नर नावाच्या निग्रो पाद्रीबद्दल ऐकले. नॅट टर्नर दुर्दैवाने पकडला गेला आणि त्याला ठार मारण्यात आले पण त्यांच्या कामाने मिंटी खूप प्रभावित झाली. एकदा तिने गुलामांकडून काम करून घेणाऱ्या ठेकेदाराला न जुमानता एका गुलामाला पळून जायला मदत केली. संतप्त झालेल्या ठेकेदाराने एक मोठा दगड गुलामाच्या दिशेने भिरकावला. पण तो नेमका मिंटीच्या डोक्यावर जाऊन आदळला. ती मरता मरता वाचली पण तिला गंभीर दुखापत झाली. आयुष्यभरासाठी एक मोठा व्रण तिच्या कपाळावर

राहिला. लोकांना तिच्या धाडसाचे खूप कौतुक वाटले. तेव्हापासून ते तिला मिंटी न म्हणता हॅरिएट या तिच्या आईच्या नावाने हाक मारू लागले. वयाच्या तेविसाव्या वर्षी हॅरिएट जॉन टबमॅन नावाच्या स्वतंत्र काळ्या माणसाच्या प्रेमात पडली आणि त्यांचे लग्न झाले. तिने हौसेने जॉनच्या पलंगाच्या मापाची नक्षीदार अशी एक सुंदर चादर शिवली आणि ती जॉनसोबत राहायला गेली. जॉन खूप आनंदात होता पण हॅरिएट तणावाखाली असायची. तिचा मूळ मालक मिस्टर ब्रॉडस मरण पावला आणि आता डॉ. अँथनी थॉम्पसन तिचा नवा मालक झाला. तिला सारखी भीती वाटायची की हा नवीन मालक आपल्याला विकून टाकेल. तिने जॉनला आपण उत्तरेकडे पळून जाऊ अशी खूप विनवणी केली पण तो काही तयार झाला नाही.

हॅरिएटची भीती खरी ठरली. डॉ.थॉम्पसनने तिला आणि तिच्या तीन भावांना विकून टाकले. गुलामांचा व्यापारी त्यांना घेऊन जाण्यासाठी लवकरच येणार होता. आपले भाऊ काही पळण्याचे धाडस करणार नाही हे तिला माहित होते म्हणून तिने एकटीनेच पळून जाण्याचे ठरवले. रात्री सगळे झोपल्यावर थोडे खाण्यापिण्याचे सामान आणि पांघरूण घेऊन ती तिथून निघाली. जंगल घनदाट आणि अंधारलेले होते. आपला माग काढायला सोडलेल्या कुत्र्यांना वास येऊ नये म्हणून ती जास्तीत जास्त वेळ नद्या-नाल्यांतून पाण्यातून चालत होती. पहिल्यांदा ती एका क्वेकर महिलेकडे गेली. तिच्याशी तिची चांगली मैत्री झाली. (क्वेकर हा एक धार्मिक पंथ आहे. त्याचे अनुयायी अहिंसा आणि समानता ह्या मुल्यांवर विश्वास ठेवतात.) त्या बाईने तिला उत्तरेकडे जाण्याचा पुढचा मार्ग समजावून सांगितला. हॅरिएटने तिचे मनापासून आभार मानले. पैसे नव्हते म्हणून त्या बाईला तिने कृतज्ञता म्हणून चादर भेट दिली.

हॅरिएट दिवसा क्वेकर लोकांकडे लपून राही आणि रात्री प्रवास करी. एकदाची ती पेन्सिल्वेनिया राज्यातल्या फिलाडेल्फिया शहरात पोचली. आता ती स्वतंत्र झाली होती. गुलामीतून मुक्त झाल्याचा तिला प्रचंड आनंद झाला पण प्रेमाची माणसे मात्र दूर आहेत हे आठवून तिला दुःखही झाले. तिने तेव्हाच निश्चय केला की संधी मिळेल तेव्हा आपल्या माणसांकडे परत जायचे आणि त्यानांही इकडे घेऊन यायचे.

काही दिवसांनी हॅरिएटला हॉटेलमध्ये नोकरी मिळाली. लवकरच तिची ओळख गुलामगिरीची वाईट प्रथा संपवण्यासाठी लढणाऱ्या अबोलीशनिस्ट लोकांशी तसेच 'कंडक्टर' म्हणून ओळखण्या जाणाऱ्या भूमिगत रेल्वे चळवळीच्या कार्यकर्त्यांशी झाला. ते गुलामांना दक्षिणेकडून कॅनडाच्या भूमीत पळवून आणायचे आणि स्वतंत्र करायचे. तेवढ्यात हॅरिएटला कळले की तिची बहिण आणि कुटुंबीय विकले जाणार आहेत. मोठी जोखीम घेऊन ती मेरिलँडला गेली आणि त्यांना सुरक्षितपणे उत्तरेकडे घेऊन आली. भूमिगत रेल्वेची 'कंडक्टर' म्हणून ही तिची पहिली कामगिरी होती आणि अर्थातच ही तर सुरुवात होती.

जवळपास सात वर्षे तिने उत्तर-दक्षिण अशा अनेक चकरा मारल्या आणि कैक गुलामांना उत्तरेकडे घेऊन आली. एकदा तिने पुरुषाचा वेष केला आणि गुलामाच्या मालकांना चकवून आपल्या नवऱ्याला, जॉनला भेटायला गेली. पण त्याने दुसरे लग्न केले होते आणि तो सोबत यायला तयार नाही ह्याचा तिला मोठा धक्का बसला. तिच्यासाठी सगळ्यात अविस्मरणीय घटना जून १८५७ मधली होती. भाड्याच्या गाडीत घालून ती आपल्या आई-बाबांना उत्तरेकडे घेऊन आली आणि त्यांची गुलामगिरीतून सुटका केली.

हॅरिएटची प्रसिद्धी दिवसेंदिवस वाढत होती. गुलामांच्या मालकांनी तिला जिवंत किंवा मृत पकडून देणाऱ्याला चाळीस हजार डॉलरचे बक्षीस जाहीर केले होते. तरीही आपल्या गुलाम बांधवाना स्वतंत्र करण्याचे काम तिने चालूच ठेवले. शेवटी मित्रांनी खूप समजावल्यानंतर तिने हे जोखमीचे काम बंद केले. त्यानंतर ती आपल्या ह्या साहसी कामाची व्याख्याने ठिकठिकाणी देऊ लागली. त्या दरम्यान तिने अबर्न, न्यूयॉर्क इथे छोटी शेती खरेदी केली आणि तिथेच कायमचे राहण्यासाठी घर बांधले. १८६१ च्या नागरी युद्ध्याच्या वेळी तिने पूर्वीच्या गुलामांना नवीन आयुष्यात स्थिर होता यावे ह्यासाठी मदतकार्य सुरु केले. त्या काळात तिने नर्स, स्वयपांकी, हेर अशी विविध कामे केली.

चार वर्षांनी युद्ध संपले तेव्हा ती आपल्या घरी अबर्न, न्यूयॉर्कला परतली. तिथे तिने आपल्या आई-बाबांची सेवा-शुश्रुषा केली. गुलामगिरीतून मुक्त झालेले गरीब लोक तिच्याकडे मदतीला येत. तिने त्यांच्यासाठी नर्सिंग होम आणि हॉस्पिटल तसेच म्हाताऱ्या काळ्या लोकांसाठी हॅरिएट टबमॅन वृद्धाश्रम सुरु केले. वयाच्या ब्याणव्या वर्षी तिचा मृत्यू झाला तेव्हा लोकांना अनावर दुःख झाले. तिने हजारो लोकांची गुलामगिरीतून सुटका केली आणि नवे आयुष्य दिले. त्यामुळे लोक तिला देवासारखे मानतात.

एलिझाबेथ कॅडी स्टँटन
(१८१५-१९०२)
सुझान बी अँथनी
(१८२०-१९०६)

“स्त्री आणि पुरुष जन्मतःच समान आहेत असे आमचे ठाम मत आहे.”

-एलिझाबेथ कॅडी स्टँटन ने लिहिलेल्या भाषणामधून

उंच, बारीक आणि अविवाहित असलेली सुझान बी. अँथनी आणि तीन मुलांची आई असलेली बुटकी, गुटगुटीत एलिझाबेथ कॅडी स्टँटन या दोघींमध्ये बघायला गेलं तर काहीच साम्यस्थळे नव्हती. पण एलिझाबेथला पहिल्या भेटीतच सुझान खूप आवडून गेली. त्यांच्या घट्ट मैत्रीचा पाया होता त्यांचे समान ध्येय - अमेरिकन महिलांना मुलभूत अधिकार मिळवून देणे.

एलिझाबेथचा जन्म जॉन्सटाऊन, न्यूयॉर्क येथे झाला. न्यायमूर्ती कॅडींना चार मुली आणि एक मुलगा होता. एकुलता एक एलेझार वडिलांचा अतिशय लाडका होता. एलेझार मोठा होऊन उत्तम वकील बनेल याची न्यायमूर्ती कॅडींना पुरेपूर खात्री होती. पण दुर्दैवाने एलेझारचे लहानपणीच निधन झाले. न्यायमूर्ती कॅडींना अतिशय दुःख झाले. ते एकदा एकटेच अश्रु ढाळत बसले असताना एलिझाबेथ त्यांच्याजवळ गेली आणि त्यांचे सांत्वन करू लागली. तिचे मस्तक कुरवाळत ते म्हणाले, “एलिझाबेथ बेटा, तू मुलगा असतीस तर किती बरं झालं असतं.”

लोकांना मुलींपेक्षा मुलगे जास्त आवडतात हे एलिझाबेथला ठाऊक होते. तिला वाटे, ती मुलांसारखे बनू शकली तर किती छान होईल. तिने शेजारी राहणाऱ्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याकडून ग्रीक भाषेचे धडे गिरवायला सुरुवात केली. ग्रीक भाषा त्या काळी फक्त मुलांनाच शिकवली जायची. ती घोडेस्वारी सुद्धा शिकली. त्या काळी जॉन्सटाऊन अकादमी महिलांना प्रवेश देणाऱ्या मोजक्या विद्यालयांपैकी एक होती. एलिझाबेथने जॉन्सटाऊन अकादमीमध्ये प्रवेश घेतला आणि मन लावून अभ्यास केला.

महाविद्यालयांमध्ये मात्र महिलांना प्रवेश नव्हता. उच्चशिक्षित व्हायचे एलिझाबेथचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही. नंतर तिने खास महिलांसाठीच्या ट्रॉय विद्यालयामध्ये प्रवेश मिळवला. एलिझाबेथचे लवकर लग्न करून टाकावे असे तिच्या वडिलांना वाटत होते. तिने मात्र वडिलांचा हा बेत धुडकावून लावला. ती आपला जास्तीत जास्त वेळ पीटरबॉरो, न्यू हॅम्पशायर येथे राहणाऱ्या मावशीसोबत घालवत असे. तिची मावशी, गेरीट स्मिथ, गुलामगिरी संपवण्याचा वसा घेतलेल्या अबोलीशनिस्ट पंथाची समर्थक होती. तिने पळून आलेल्या अनेक

गुलामांना आसरा दिला होता. तिथेच तिची ओळख हेन्री ब्रुस्टर स्टँटनशी झाली जो गुलामगिरी विरोधात तडफदार भाषणे देऊन आवाज उठवत होता. हेन्री आणि एलिझाबेथ एकमेकांच्या प्रेमात पडले आणि त्यांनी लग्न केले. आता दोघे मिळून गुलामगिरी विरोधात लढा देऊ लागले. परंतु अधिवेशनामध्ये प्रतिनिधित्व करण्याची संधी फक्त पुरुषांनाच दिली जायची याचा एलिझाबेथला खूप राग यायचा. तिने आपली मैत्रीण लुक्रेशिया मोटला सोबत घेऊन स्वतःच एका अधिवेशनाचे आयोजन करण्याचे ठरवले. या अधिवेशनात त्यांनी आणखी एका ज्वलंत प्रश्नावर चर्चा घडवून आणली ती म्हणजे महिलांनाही समान अधिकार.

हे ध्येय पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांना आठ वर्षे लागली. या काळात सेनेका फॉल्स मध्ये एलिझाबेथ एकटीच आपल्या तीन मुलांचा सांभाळ करत होती. तिचे पती नेहमीच दौऱ्यावर असत. आता तिला समजले की नवऱ्याकडून मदतीची फारशी अपेक्षा न बाळगता घरातली कधीही न संपणारी रटाळ कामे करत राहणे हेच बहुतांश स्त्रियांचे आयुष्य आहे.

१९ जुलै १८४८ रोजी पहिले महिला हक्क अधिवेशन झाले. जवळपास तीनशे लोकांनी या अधिवेशनात सहभाग घेतला. एलिझाबेथच्या भाषणाने अधिवेशनाची सुरुवात झाली. एक स्त्री एवढ्या मोठ्या जनसमुदायासमोर भाषण करते आहे हे बघून अनेकांना धक्का बसला. महिलांनी भाषण करणे चुकीचे आहे असा लोकांचा ठाम विश्वास होता. तिच्यानंतर स्वातंत्र्य आणि समानतेचा पुरस्कार करणाऱ्या अनेक मान्यवरांची भाषणे झाली. अधिवेशन संपले तेव्हा एलिझाबेथ पार थकून गेली होती. पण तिचे मन समाधानाने भरले होते कारण त्या रात्री नवीन इतिहास लिहिला गेला होता, एका नव्या पर्वाची सुरुवात झाली होती. त्यानंतर एलिझाबेथ तिच्या मित्रांना आणि हितचिंतकांना आवर्जून सांगे की तिचा उल्लेख श्रीमती हेन्री स्टँटन असा न करता एलिझाबेथ कॅडी स्टँटन असाच करावा. केवळ लग्न झाले म्हणून स्त्रीने आपली स्वतःची ओळख गमावता कामा नये असे तिचे ठाम मत होते.

दरम्यान, त्या ऐतिहासिक अधिवेशनाची बातमी रोचेस्टरमधील एका निग्रही तरुणीच्या कानावर गेली होती. तिचे नाव होते सुझान ब्राउनेल अँथनी. सुझानचा जन्म अॅडम्स, मॅसॅच्युसेट्स येथील एका क्वेकर कुटुंबात झाला होता. तिचे वडील, डॅनिएल अँथनी, अबोलीशनिस्ट होते. त्यांच्यासोबत सुझानही गुलामगिरी विरोधातील चर्चांमध्ये सक्रीय सहभाग घेत असे.

सुझानच्या वडिलांची एक छोटी कापड गिरणी होती. एक कामगार जेव्हा दोन आठवड्यांच्या रजेवर गेला होता तेव्हा सुझानने त्याची जागा घेतली. तिला तिच्या कामाचा मोबदलाही दिला गेला. यावरून अनेकांनी तिच्या वडिलांवर टीका केली. सुझान मात्र आपल्या स्वकमाईवर खुश होती.

पण गिरणीत काम करण्यासाठी तिचा जन्म झाला नव्हता. फिलाडेल्फिया मधील क्वेकर महिला विद्यालयात तिने आपले शिक्षण सुरु ठेवले. परंतु वडिलांना व्यवसायात अपयश आल्यामुळे तिला शिक्षण अर्धवट सोडून घरी परतावे लागले. न्यू रॉचेल येथे तिने शिक्षिका म्हणून काम सुरु केले. त्यानंतर तिची रोचेस्टर येथे बदली झाली. पुरुषांच्या तोडीचे काम करूनही पुरुषांच्या केवळ एक चतुर्थांश पगार आपल्याला मिळतो याचे तिला फार वाईट वाटे. पण तरीही ती मनापासून काम करी. सेनेका फॉल्सच्या अधिवेशनाबद्दल ऐकल्यावर सुझानने एलिझाबेथ कॅडी स्टँटनला भेटण्याचा निश्चय केला.

सुझान आणि एलिझाबेथची छान गट्टी जमली. आता सहा मुलांची आई झालेल्या एलिझाबेथला सतत दौऱ्यावर जाणे अजिबातच शक्य नव्हते. त्यामुळे तिने भाषणे लिहायची आणि सुझानने विविध दौऱ्यांवर जाऊन ती सादर करायची असे त्यांनी ठरवून टाकले. त्याकाळी विवाहित स्त्रियांना स्वतःच्या नावावर कोणतीही मालमत्ता ठेवण्याचा हक्क नव्हता. सुझान आणि एलिझाबेथने विवाहित महिलांसाठी मालमत्तेच्या अधिकाराची मागणी केली. यासाठी त्यांना अनेक वर्षे लढा द्यावा लागला. अखेर १८६० मध्ये न्यूयॉर्क राज्याने विवाहित महिलांचा आपल्या स्वकमाईच्या उत्पन्नावर आणि वारसाहक्काने मिळालेल्या मालमत्तेवर पूर्ण अधिकार आहे असा कायदा संमत केला. ही तर फक्त सुरुवात होती. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळवून देणे हे सुझान आणि एलिझाबेथचे ध्येय होते. त्याकाळात मतदानासारखा महत्वाचा हक्क बजावण्यासाठी महिला लायक नाहीत असे अनेकांचे म्हणणे होते. समाजाची मानसिकता बदलणे फारच खडतर काम होते.

सुझान आणि एलिझाबेथने मग भाषण दौऱ्यांचा सपाटाच लावला. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठीच्या विनंती अर्जावर त्यांनी हजारो स्वाक्षऱ्या मिळवल्या. माहिती पत्रके विकून पैसे गोळा केले. दोघींनी मिळून 'द रिव्होल्युशन' नावाचे वृत्तपत्र सुरु केले आणि महिला हक्क चळवळीसंदर्भातील अनेक पुस्तकेही प्रकाशित केली.

१९०२ मध्ये एलिझाबेथचा मृत्यू झाल्यावर सुझानला फारच एकटे वाटू लागले. त्यानंतर चार वर्षांनी सुझानचा देखील मृत्यू झाला. तोपर्यंत फक्त वायोमिंग, युटाह, कोलॅरॅडो आणि इडाहो या चारच प्रांतांनी स्त्रियांना मतदानाचा हक्क दिला होता. अखेर १९२० मध्ये अमेरिकेत संविधानात दुरुस्ती झाली आणि सर्व स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. सुझान आणि एलिझाबेथचे अथक परिश्रम आणि तीव्र संघर्ष ह्याशिवाय हे कदापि शक्य झाले नसते.

क्लारा बार्टन
(१८२१-१९१२)

"कित्येक दिवस थंडीत गारठलेल्या जखमींना माझ्याकडे आणण्यात आलं...अजून अनेक जखमी गार बर्फावर पडून होते...त्यांची काळजी घ्यायला कुणीही नव्हतं..."

- क्लारा बार्टनने केलेल्या फ्रेडरिक्सबर्ग युद्ध्याच्या वर्णनातून

१८२१ साली ख्रिसमसच्या दिवशी नॉर्थ ऑक्सफर्ड, मॅसॅच्युसेट्समध्ये एका मुलीचा जन्म झाला. तिचे नाव होते क्लेरीसा हर्लो बार्टन. हे नाव जरा मोठे होते म्हणून सगळे तिला क्लारा म्हणत. क्लारा आपल्या बहीण-भावांमध्ये सगळ्यात धाकटी होती. ती सगळ्यांची खूप लाडकी होती. त्यांनी तिला वाचन, लेखन, गणित, घोडेस्वारी, सुतारकाम अशी बरीच कामे शिकवली. तिची आई शिस्तप्रिय असली तरी प्रेमळ मनाची होती. तिने क्लाराला बाहुल्या किंवा खेळणी न देता स्वयपांक, शिवणकाम आणि घर चालवण्यासाठी लागणारी इतर कामे शिकवली.

क्लारा खूप हुशार पण लाजाळू होती. अकरा वर्षाची असताना तिचा बराचसा वेळ आपल्या आजारी भावासोबत त्याची सेवा-सुश्रुषा करण्यात गेला. हा अनुभव तिला भविष्यामध्ये चांगलाच कामाला येणार होता. लोक तिच्या आईला म्हणू लागले की क्लाराने आता अधिक जबाबदारी घेणे आवश्यक आहे आणि शिक्षिकेची नोकरी ती चांगली करू शकेल. अठरा वर्षाची झाल्यावर क्लारा एका खोलीत शाळा चालवू लागली. शाळेतले काही जुने विद्यार्थी चांगलेच दांडगट होते. त्यांनी आधीच्या शिक्षिकेला खूप त्रास दिला होता. शाळेच्या पहिल्या दिवशीच क्लाराने मधल्या सुट्टीमध्ये त्या मुलांना तिच्यासोबत खेळायला बोलावले. तिचे भरधाव पळणे तसेच चेंडू उडवण्याचे कौशल्य पाहून मुले थक्क झाली. त्यानंतर त्या मुलांनी अथवा इतर कुठल्याही मुलांनी तिला कधीच त्रास दिला नाही.

व्रात्य मुलांना हाताळणारी उत्तम शिक्षिका म्हणून क्लाराचे नाव झाले. दहा वर्षे ती एका पाठोपाठ एक अशा अडचणीत असलेल्या अनेक शाळांची घडी नीट बसवण्याचे काम करीत होती. नंतर१८५० मध्ये तिने स्वतःच्या शिक्षणाकडे लक्ष देण्याचे ठरवले. ती क्लिंटन, न्यूयॉर्क येथील अध्यापक विद्यालयामध्ये एका वर्षासाठी दाखल झाली आणि तिथून न्यूजर्सीला शिकवण्यासाठी रुजू झाली. काही वर्षानंतर बॉर्डरटाउन, न्यूजर्सी इथे काही कामानिमित्त गेली असताना तिला कळले की मॅसॅच्युसेट्ससारख्या इकडे निशुल्क सरकारी शाळा नाहीत. आईवडील आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी फी देत आणि ज्यांना फी भरणे शक्य नसे त्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते हे पाहून तिला खूप वाईट वाटले.

तिने शाळेच्या कार्यकारिणीसमोर प्रस्ताव ठेवला की जर तिला एक शाळा चालवायला दिली तर ती त्या शाळेत विनावेतन शिकवेल.

दुसऱ्याच दिवशी क्लाराला एक शाळा देण्यात आली. शाळेची इमारत अगदी जुनी आणि पडकी होती. पहिल्या दिवशी शाळेत फक्त सहाच विद्यार्थी आले. पण दोनच वर्षात शाळेची विद्यार्थीसंख्या सहाशेवर पोचली तसेच शाळेला नवीन इमारत मिळाली. त्यानंतर कार्यकारिणीने निर्णय घेतला की ह्यापुढे एक बाई शाळा चालवणार नाही आणि पुरुष मुख्याध्यापक नेमला. ह्यामुळे संतापून क्लाराने नोकरीच नाही तर शिक्षणक्षेत्रही सोडले. तिला वॉशिंग्टन डी.सी.ला पोस्ट ऑफिसमध्ये नोकरी मिळाली. तिथे नोकरी मिळालेली ती पहिलीच महिला होती.

अब्राहम लिंकन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर काही वर्षांतच नागरी युद्ध भडकले. क्लाराची नोकरी चालू होती. युध्दातील गंभीर जखमी आणि रक्तबंबाळ सैनिकांना परतताना पाहून तिला प्रचंड दु:ख झाले. तिने वर्तमानपत्रातून ह्या सैनिकांसाठी बँडेज, औषधे, अन्न आणि कपडे देण्याचे लोकांना आवाहन केले. लोकांनी या आवाहनाला अभूतपूर्व प्रतिसाद दिला. लवकरच एवढे सामान जमा झाले की ते ठेवायला तिच्याकडे जागा शिल्लक नव्हती. हे साहित्य तिला युद्धभूमीवरच्या गरजूंपर्यंत पोहचवायचे होते.

युद्धविभागासाठी हे फारच धक्कादायक होते. तेव्हा महिला युद्धभूमीवर जात नसत पण क्लाराने वारंवार विनंती केल्यावर अखेर तिला आणि तिच्या तीन सहकाऱ्यांना परवानगी देण्यात आली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सामान नेण्यासाठी त्यांनी काही खेचरे आणि गाडीचीही सोय केली. क्लारा युद्धभूमीवर सैनिकांसाठी भल्या मोठ्या पातेल्यात सूप, चहा, कॉफी तसेच हजारो पावाच्या लाद्या बनवत असे.

क्लाराला दिसले की जखमी सैनिकांना हॉस्पिटलमध्ये पोचायलाच वेळ लागतो आणि त्या वेळात त्यांचा जीव जाऊ शकतो. म्हणून तिने त्यांना युद्धभूमीवरच तातडीने उपचार द्यायला सुरुवात केली. ही खूपच अभिनव कल्पना होती. तिने बाजूलाच तंबू व बसमध्ये हॉस्पिटल उभारले आणि जखमीची सेवा सुरु केली. ह्याच हॉस्पिटलमध्ये शत्रूराष्ट्राच्या सैनिकांवरही उपचार करणे महत्वाचे आहे ह्यावर ती ठाम राहिली. ते पाहून युद्धविभागाला धक्काच बसला. सैनिक तिला "युद्धभूमीवरची देवता" मानायचे.

१८६५ मध्ये नागरी युद्ध संपल्यावर क्लारा बार्टनने स्वत:च्या पैशातून एक संस्था स्थापन केली जी हरवलेल्या सैनिकांना शोधण्याचे आणि मृत सैनिकांच्या प्रेताची ओळख पटवून देण्याचे काम करीत असे. ह्या कामामुळे ती मनाने आणि शरीराने पार खचून गेली. म्हणून १८६९ मध्ये आराम करण्यासाठी ती स्वित्झर्लंडला गेली.

जिनिव्हामध्ये क्लाराने आंतरराष्ट्रीय रेड क्रॉसबद्दल ऐकले. रेड क्रॉस ही संस्था युद्धकाळात जखमी आणि आजारी सैनिकांसाठी काम करत असे. अमेरिकेत परतल्यावर तिने राष्ट्राध्यक्ष रुदरफोर्ड बी. हेस यांना ह्या संस्थेचे सदस्य होण्यासाठी विनंती केली. पण त्यांनी नकार दिला. कारण अमेरिकेत कधीही युद्ध होणार नाही असा बहुतांश लोकांचा ठाम विश्वास होता. पण क्लारा रेड क्रॉस संस्थेअंतर्गत आपत्तीनिवारणाचे कार्य करण्यासाठी आग्रही राहिली. तिने भूकंप, पूर, दुष्काळ, वणवे, वादळे अशा नैसर्गिक आपत्तीग्रस्त पीडितांसाठी काम करणे सुरु केले.

१८८१ मध्ये क्लाराने अन्य काही लोकांच्या मदतीने 'अमेरिकन असोसिएशन ऑफ द रेड क्रॉस' या संस्थेची स्थापना केली. ह्या संस्थेची पहिली अध्यक्ष म्हणून तिची नियुक्ती झाली. काही वर्षानंतर वयाच्या साठीत असताना क्लारा जॉन्सटाउन, पेन्सिल्वेनिया येथे आपत्तीनिवारणाच्या कामासाठी गेली. पाच दिवसांपूर्वी तिथे शहराला उद्ध्वस्त करणारा भयंकर पूर येऊन गेला होता. पाच महिने क्लारा तिकडेच थांबली. एका छोट्या तंबूमध्ये रिकाम्या खोक्याचा टेबलसारखा वापर करून ती दिवसरात्र गरजूंना मदत करत होती. स्पॅनिश-अमेरिकन युद्धात सैनिकांची सेवा-सुश्रुषा करायला ती घोडागाडीतून युद्धभूमीवर पोचली. क्युबामध्ये युद्धात मरण पावलेल्या व हरवलेल्या सैनिकांच्या मुलांसाठी तिने अनाथाश्रम सुरु केले.

एक्क्याण्णव्या वर्षी क्लाराचा मृत्यू झाला. तिचे पार्थिव दफनासाठी ग्लेनएको, मेरिलँडमधून पूर्वी राहत असलेल्या नॉर्थ ऑक्सफर्ड, मॅसॅच्युसेट्स इथे आणण्यात आले. तिचा मृतदेह घेऊन येणाऱ्या डायव्हरने एक आठवण सांगितली. युद्धात त्याचे वडील खूप रक्तस्त्राव होऊन मरणासन्न अवस्थेत पडले होते, त्यावेळी क्लाराने त्यांचे प्राण वाचवले होते. त्यांचा मुलगा म्हणून उपकारातून ऋणाईत होण्याची छोटी संधी ह्या निमित्ताने त्याला मिळाली.



एमिली डिकिन्सन
(१८३०-१८८६)

"कवितेचे पुस्तक वाचले की मी अगदी थिजून जाते, मग पेटते निखारेदेखील माझ्या अंगात ऊब आणू शकत नाहीत. मला आंतरबाह्य हलवून टाकणारी एकमेव गोष्ट आहे ती म्हणजे फक्त आणि फक्त कविता."

-एमिली डिकिन्सनने थॉमस वेन्टवर्थ हिगिन्सन यांना लिहिलेल्या पत्रातून.

एमिली अतिशय लाजाळू मुलगी होती. तरीसुद्धा मॅसॅच्युसेट्समधील ॲमहर्स्ट शहरात राहणाऱ्या या मुलीला विविध सहली, खेळ आणि पार्ट्यांची सारखी आमंत्रणे यायची. पुस्तके आणि शब्दकोश हेच तिचे सर्वात जवळचे सवंगडी होते. एमिलीला चांगले शिक्षणदेखील मिळाले. तिने सहा वर्षे ॲमहर्स्ट अकादमी मध्ये धडे गिरवले. नंतर तिने माउंट होलीओक महिला विद्यालयात प्रवेश घेतला. एमिलीला या विद्यालयातील वातावरण फारसे आवडले नाही. तिथे मुलींना सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये आपल्या धार्मिक श्रद्धेविषयी भाष्य करण्यास सांगितले जायचे. त्यामुळे एका वर्षातच एमिली घरी परतली.

बालपणीची जिवलग मैत्रीण, सोफिया हॉलंडच्या आकस्मिक मृत्यूने एमिलीला फारच मोठा धक्का बसला. हळूहळू ती जगापासून अलिप्त होऊ लागली. ती अधूनमधून कॉंग्रेसचे सदस्य असलेल्या आपल्या वडिलांना भेटायला वॉशिंग्टन डी.सी.ला जायची. वयाच्या विशीत असताना फिलाडेल्फियालाही तिचे जाणे व्हायचे. नंतर ती डोळे तपासून घेण्यासाठी बॉस्टनला चक्कर टाकत असे. पण तरीही ती जगापासून तुटत चालली होती. तिचा स्वभाव दिवसेंदिवस एकलकोंडा होत चालला होता.

हळूहळू तिने घरातून बाहेर जाणे पूर्ण बंद करून टाकले. तिला भेटायला आलेल्या पाहुण्यांना बघायची देखील तिला इच्छा नसे. बिचारे पाहुणे बंद दाराआडूनच तिच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत. एकदा तिने घराखाली खेळणाऱ्या मुलांसाठी गरमागरम जिंजरब्रेड असलेली टोपली खिडकीतून खाली सोडली. मुलांनी हसत खिदळत स्वादिष्ट जिंजरब्रेड मटकावले. ते कुंपणावर चढून जिंजरब्रेड देणाऱ्या मुलीला पाहण्याचा प्रयत्न करत. पण त्यांना ती क्वचितच नजरेस पडे. जेव्हा त्यांना तिचे दर्शन होई तेव्हा कायमचं ती पांढऱ्या कपड्यांमध्ये असे. तिने दुसरे रंग वापरणे सोडून दिले होते. एमिली तिचे कपडे शिवणाऱ्या शिंप्यासमोरसुद्धा जात नसे. एमिलीची बहीण लॅविनियाच तिचे कपडे

शिवून आणी. दोघी बहिणी एकत्रच राहत. त्यांचा एकमेकींवर खूप जीव होता. पण एमिलीचे स्वतःचेच एक प्रगल्भ आणि परिपूर्ण असे विश्व होते. ब्रेड भाजणे , झाडांना पाणी घालणे , स्वयंपाक करणे अशी दैनंदिन कामे करत असताना ती कागदाच्या कपट्यावर, वृत्तपत्राच्या समासामध्ये कविता लिहित असे. त्यानंतर ती खोलीत बसून त्या कविता शाईपेनाने नीट लिहून काढी. या कवितांचे गठ्ठे शिवून तिने छोटी पुस्तके बनवली होती. ही पुस्तके तिने एका कुलुपबंद पेटीत घालून कपाटात लपवून ठेवली होती.

तिच्या कविता असाधारण, आश्चर्याचा धक्का देणाऱ्या आणि अप्रतिम होत्या. निसर्ग, प्रेम, मृत्यू, देव या विषयांवर तिने अनेक कविता लिहिल्या. आपल्या तीक्ष्ण नजरेने ती निसर्गातले बारकावे अचूक टिपत असे. एमिलीच्या कविता बहुतांश वेळा लहान असत. ती आत्मविश्वासाने आपल्या कवितांसाठी विविध आकृतिबंध वापरून बघायची. यमक आणि विरामचिन्हांशी खेळायची. उदाहरणादाखल तिने मांजरीवर लिहिलेली ही एक कविता –

तिला पाखरू दिसलं - ती खिदळली
जमिनीवर घेतली लोळण आणि दबा धरून बसली
निघाली पुढे - दबकत दबकत -
तिच्या डोळ्यांच्या बाहुल्या – विस्फारलेल्या –

पोटात भूक – डोळ्यात आग
दात शिवशिवलेले – खाण्यासाठी
घेतली उडी पण पाखरू पसार
बिचारी मनी - इलाज काय

डोळ्यात मेजवानीचे स्वप्न
तोंडातून टपकणारी लाळ
तोंडचा घास – उडून गेला
गेले प्रयत्न वाया

ॲमहर्स्टमधले आयुष्य शांत तरीही समृद्ध होते. दैनंदिन कामे आणि पत्रलेखन करण्यात वेळ कसा निघून जाई कळायचे नाही. एमिलीची पत्रे आजही उपलब्ध आहेत. आपल्या पत्रांमध्ये ती एका मोहक, आकर्षक आणि बुद्धिमान मैत्रिणीसारखी भासते. एमिली तिचा कुत्रा, कार्लोला घेऊन दूरवर भटकायला जायची. आई आजारी असताना तिने तिची मनापासून सेवा केली. कविता तर तिची आयुष्यभराची सोबती होती.

एमिली क्वचितच कोणाला आपल्या कविता दाखवायची. तिच्या कडक शिस्तीच्या वडिलांनी तर तिची एकही कविता वाचली नाही. प्रसिद्ध लेखक आणि समीक्षक थॉमस वेन्टवर्थ हिगिन्सन यांच्याशी एमिलीचा नियमित पत्रव्यवहार होई. त्यांनी तिच्या काही कविता वाचल्या होत्या. हिगिन्सन यांनी एमिलीला तिच्या कविता प्रकाशित करण्यापासून परावृत्त केले. ते एमिलीमधली प्रतिभा ओळखू शकले नाहीत. नंतर कदाचित त्यांनी आपले मत बदललेही असेल. पण त्यांच्या शब्दांनी एमिली नाउमेद झाली. आपल्या हयातीत तिने स्वत:च्या केवळ सातच कविता प्रकाशित केल्या.

एमिलीच्या मृत्यूनंतर तिच्या कपाटात लॅविनियाला एमिलीने छोट्या छोट्या वह्यांमध्ये लिहून ठेवलेल्या जवळपास १,८०० कविता सापडल्या. कवितांची संख्या बघून तिला आश्चर्याचा धक्का बसला. एमिलीच्या प्रतिभेची तिला खात्रीच पटली. या कविता प्रकाशित करणे आणि जगासमोर आणणे यासाठीच लॅविनियाने आपले आयुष्य वाहून घेतले. तिच्या अथक परिश्रमामुळेच आज एमिली डिकिन्सन अमेरिकेतील महान आणि अस्सल कवयित्रींपैकी एक गणली जाते.



मेरी कॅसट
(१८४४-१९२६)

"मी तिथे जायचे आणि काचेवर नाक घासून पलीकडची चित्रं डोळ्यांमध्ये साठवायचा प्रयत्न करायचे. त्या चित्रांनी माझं आयुष्यच बदलून टाकलं. अशा असामान्य कलेच्या मी अनेक वर्ष शोधात होते."

- मेरी कॅसटचे एडगर देगासच्या कलेविषयीचे उद्‌गार

चित्रकाराने ब्रश रंगात बुडवला तशी सात वर्षांची लहानगी मेरी डोळे विस्फारून पाहत राहिली. मेरीचे तीन भाऊ अलेक्झांडर, गार्डनर, आणि रॉबी यांचे पोर्ट्रेट काढण्यासाठी खास चित्रकाराला बोलावण्यात आले होते. मेरीलाही त्यांच्यासोबत आपले चित्र काढून घ्यायला आवडले असते. पण त्या चित्रकाराला चित्र काढताना बघणे आणखी उत्कंठावर्धक होते. त्याच्या कुंचल्याच्या फटकाऱ्यांनी कॅनवास जणू जिवंत झाला होता. मेरी पहिल्यांदाच एखाद्या चित्रकाराला बघत होती. तिच्या नकळत तिची या कलेच्या दिशेने वाटचाल सुरु झाली होती.

मेरी आपल्या चार भावंडांसोबत पेन्सिल्वेनिया मधील ॲलेघेनी शहरात राहायची. पोर्ट्रेटच्या प्रसंगानंतर थोड्याच दिवसांनी तिचे कुटुंब पॅरिसला राहायला गेले. मेरीला तिथे लुवर सारखी प्रसिद्ध संग्रहालये बघायला मिळाली. नंतर ते जर्मनीत गेले. पण तिथे रॉबी प्रचंड आजारी पडला आणि त्याचा मृत्यू झाला. दुःखात बुडालेले मेरीचे कुटुंब पुन्हा मूळ घरी परतले.

सोळा वर्षांची झाल्यावर मेरी पेन्सिल्वेनिया अकादमीमध्ये चित्रकलेचे धडे गिरवायला गेली. तिथे तिने मानवाकृत्या कशा रेखाटाव्या याचा अभ्यास केला. लिओनर्दो दा विंची, रेम्ब्रांट आणि टीटीयटच्या कलाकृतींचा अभ्यास करण्यासाठी आपण युरोपला जायला हवे असे मेरीला सारखे वाटे. केवळ हौशी कलाकार न राहता एक व्यावसायिक चित्रकर्ती म्हणून आपण नाव कमावले पाहिजे असेही तिला वाटू लागले. मेरीचा हा विचार मात्र तिच्या वडिलांना अजिबात पटला नाही. 'यापेक्षा तू मेलीस तर बरं होईल! मला यापुढे तुझं तोंडसुद्धा बघायचं नाहीये.' ते ओरडले. पण मेरीने वडिलांची खूप मनधरणी केली. अखेर आईला सोबत नेण्याच्या अटीवर त्यांनी मेरीला युरोपला जाण्याची परवानगी दिली.

पॅरिस मध्ये मेरीला विविध नावाजलेल्या कलाकारांच्या हाताखाली शिकायला मिळाले. जेव्हा 'अ मॅन्डोलिन प्लेयर' या तिच्या चित्राची १८६८ च्या पॅरिस सलोन प्रदर्शनासाठी निवड झाली तेव्हा तर तिचा आनंद गगनात मावेनासा झाला. नंतर तिची आणखी बरीच चित्रे सलोन कडून निवडली गेली. सलोन हे फ्रान्समधले सर्वात प्रसिद्ध चित्रकला व मूर्तीकलेचे प्रदर्शन होते. सतराव्या शतकापासूनच सलोनच्या प्रदर्शनासाठी आपल्या कलाकृतीची निवड व्हावी हे प्रत्येक तरुण चित्रकाराचे स्वप्न असायचे.

नंतर मेरीची फ्रेंच कलाकार एडवर्ड देगासशी ओळख झाली. त्याची चित्रे बघून चित्रकलेविषयीचा तिचा दृष्टीकोनच बदलून गेला. त्या दोघांची घट्ट मैत्री झाली, जी चाळीस वर्षे अतूट राहिली. देगासपासून प्रेरणा घेऊन ठसठशीत, रेखीव आकार आणि गडद, फिकट रंगछटा वापरून मेरी चित्रकलेमध्ये प्रयोग करून पाहू लागली. तिने आपली चित्रे सलोनच्या प्रदर्शनासाठी पाठवणे बंद केले. इम्प्रेशनिस्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आधुनिक चित्रकारांच्या गटाबरोबर ती प्रदर्शने भरवू लागली. त्यांचे रुंद, फारसे आखीव-रेखीव नसणारे फटकारे आणि फिकट रंगांचे कॅनवास यांची कला समीक्षक बऱ्याचदा खिल्ली उडवायचे.

इम्प्रेशनिस्ट गटाने निवडलेले चित्रांचे विषय हे समीक्षकांच्या सर्वाधिक टीकेचा विषय ठरले होते. ऐतिहासिक पात्रे आणि पुराणातल्या कथा सोडून हे कलाकार रोजच्या आयुष्यातले प्रसंग रंगवायचे. मेरीने जेव्हा या गटाबरोबर काम करायला सुरुवात केली तेव्हा हातमागावर कापड विणणाऱ्या बहिणी, सभागृहात बसलेली एक तरुणी असे तिचे सुरुवातीच्या चित्रांचे विषय होते. नंतर तिने छोट्या मुलीला अंघोळ घालणारी बाई, आईचा चेहरा कुरवाळणारे बाळ, आपल्या गुटगुटीत बाळाला मांडीवर घेऊन नाव वल्हवणारी आई अशा अनेक विषयांवर चित्रे काढली. मेरीने कधी कामाचे कंत्राट घेतले नाही. आपले आई-वडील, भावंडे, मित्र-मैत्रिणी यांना बघूनच ती चित्रे रेखाटायची. तिच्या चित्रांमधून लहान मुलांबद्दलची ओढ सतत दिसत असली तरी मेरी स्वतः कधी आई बनू शकली नाही. 'आपल्या कलेसाठी कोणताही त्याग करण्याचं सामर्थ्य प्रत्येक स्त्री चित्रकर्तीमध्ये असलं पाहिजे.' असे तिने एका मुलाखतीदरम्यान सांगितले होते. एकाच वेळी कलाकार म्हणून नाव कमावणे आणि कुटुंबाची देखभाल करणे हे स्त्री चित्रकर्तीसाठी अशक्यप्राय असे काम आहे हेच कदाचित तिला यातून सांगायचे असावे.

काही वर्षांमध्येच मेरीने एक प्रथितयश चित्रकर्ती म्हणून नाव कमावले. कलाकार जगतामध्ये मेरी कॅसटचे नाव सर्वदूर पोहोचले. शिकागो वर्ल्ड कोलंबियन एक्स्पोझिशनच्या महिलांसंदर्भातील इमारतीवर बारा फूट रुंद आणि अठ्ठावन्न फूट लांबीचे म्युरल बनवण्यासाठी तिला आमंत्रित करण्यात आले. मेरीच्या कर्तृत्वाने तिचे वडीलही चकित झाले. 'कलाकार विश्वासोबतच जनसामान्यांपर्यंतसुद्धा मेरीचे नाव पोहोचले आहे आणि हे नाव सहजासहजी पुसले जाऊ शकत नाही. जोपर्यंत मेरी चित्रे काढत राहणार आहे तोपर्यंत हा नावलौकिक वाढतच जाणार आहे.' अशा शब्दात त्यांनी मेरीची पाठ थोपटली. मेरीने पॅरिसच्या बाहेर एक भलेमोठे घर विकत घेतले. तिथे तिने चित्रे काढली, गुलाबांची बाग फुलवली आणि आपले आई-वडील व मित्र-मैत्रिणींसोबत मजेत दिवस घालवले.

मेरीने एक चित्रकर्ती म्हणून युरोपमध्ये आयुष्य व्यतीत केले असले तरी ती स्वतःला कायमच अमेरिकन म्हणवून घ्यायची. आणि आपल्या मातृभूमीमध्ये दर्जेदार कलाकृतींचा आणि प्रदर्शनांचा तुटवडा असावा याची तिला नेहमी खंत वाटायची. तिने आपल्या कुटुंबियांना आणि अमेरिकन दोस्तांना अभिजात कलेचे नमुने गोळा करायला आणि ते विविध प्रदर्शनांमध्ये पाठवायला मदत केली. तरुण चित्रकारांना या प्रदर्शनांमधून प्रेरणा मिळेल असे तिला वाटत होते. तिला स्वतःला आपल्या आयुष्याची दिशा अशा चित्रप्रदर्शनांमधूनच तर मिळाली होती.

मेरीला ब्याऐंशी वर्षांचे दीर्घ आयुष्य मिळाले. अधू डोळे धोका देईपर्यंत तैलरंग, पेस्टल्स आणि इतर माध्यमे वापरून ती चित्रे काढतच राहिली. चित्रकलेचे काम नाईलाजाने थांबवावे लागले तेव्हा तिने दुसऱ्या प्रश्नांमध्ये आपले मन गुंतवले. त्यावेळी अमेरिकेमध्ये चालू असलेल्या महिला हक्क चळवळीमध्ये तिने सक्रीय सहभाग नोंदवला. तिच्या मृत्युच्या काही दिवस आधी तिने लिहिले होते, 'मला जे करायचे होते ते मी पूर्णतः करू शकले नाही. पण मी चांगला लढा दिला असे मला वाटते.' लोकांनी म्हटले, "मेरी, ही लढाई तू जिंकलीस."

हेलन केलर
(१८८०-१९६८)

"माझ्या अखेरच्या श्वासापर्यंत मी दिव्यांगांची सेवा करीत राहीन."

- हेलन केलरने तिच्या १८ व्या वाढदिवशी पत्रकाराला दिलेल्या मुलाखतीतून

कॅप्टन केलर आणि त्यांची पत्नी तापाने फणफणलेल्या तान्ह्या हेलनला पाहून काळजीत पडले होते. डॉक्टरांचे सगळे प्रयत्न करून झाले. पण बाळाला काही गुण येत नव्हता. बाळ आता काही फार जगू शकणार नाही अशी भीती त्यांना वाटत होती. तेवढ्यात एखादा चमत्कार व्हावा तशी हेलनची तब्येत भराभर सुधारू लागली. पण दुर्दैवाने त्या आजारपणात तिची दृष्टी गेली आणि बहिरेपण आले. तिचे पुढचे सारे आयुष्य आता अंध:कारमय आणि निशब्द झाले होते.

टस्कम्बिया, अलाबामामधील हेलनचे सुरुवातीचे दिवस फार खडतर होते. हेलन कुशाग्र बुध्दीची होती पण आलेल्या परिस्थितीमुळे तिची प्रचंड चिडचिड व्हायची. पळताना आणि खेळताना ती सारखी पडायची नाहीतर कशाला तरी धडकायची. इतर मुले तिला घाबरुन असायची कारण ती त्यांना मारायची, त्यांची खेळणी तोडून टाकायची. तिच्या सहाव्या वाढदिवसाला आईने छानसा केक बनवला होता. केकच्या वासाने ती जवळ आली आणि हाताने केक चिवडून तसाच तोंडात कोंबू लागली. आईने केकचा चांगला भाग बाजूला करायचा प्रयत्न केला तर हेलनने रडून-किंचाळून गोंधळ घातला. आईने तिला शांत करायचा प्रयत्न केला तेव्हा ती रागाने बाहेर पळाली आणि काटेरी झुडुपात जाऊन आदळली. तिच्या वाढदिवसाचा पूर्ण विचका झाला. आता मात्र तिच्या आईबाबांना कळून चुकले की हेलनला सांभाळायला कुणाच्यातरी मदतीची गरज आहे.

ह्या घटनेनंतर काही दिवसांनी ते सगळे वॉशिंग्टन डी.सी.ला गेले. तिकडे हेलनची भेट टेलिफोनचा शोध लावणाऱ्या अलेक्झांडर ग्राहम बेल यांच्याशी झाली. डॉ. बेल ह्यांनी खूप वर्षे मूकबधिर लोकांसाठी काम केले होते. त्यांनी हेलनला मांडीवर घेतले. तिने त्यांच्या दाढीला हात लावला आणि त्यांच्या खिशातील घड्याळ स्वतःच्या गालाजवळ नेले. तिला घडयाळाच्या काट्याची टिक टिक जाणवली. डॉ. बेल ह्यांनी हेलनच्या आईबाबांना बोस्टनमधील अंध व बहिऱ्या मुलांना शिकवणाऱ्या विशेष शाळेबद्दल सांगितले. ते कदाचित हेलनला शिकवण्यासाठी एखादा शिक्षक देऊ शकतील असा सल्ला

दिला. लवकरच ॲन सुलेवान नावाची तरुण शिक्षिका हेलनला शिकवण्यासाठी घरी रुजू झाली. ॲनही आधी दृष्टिहीन होती. एका शल्यचिकित्सेने तिची दृष्टी परत आली होती. हेलनची शिकवणी सुरु झाली. तिने हेलनच्या हातात बाहुली दिली आणि तिच्या दुसऱ्या हातावर बोटांनी D-O-L-L (डॉल) ही अक्षरे गिरवली. बोटांनी हातावर गिरवलेल्या या अनोळखी आकारांनी सुरुवातीला हेलन गोंधळली पण लवकरच तिने ही अनोखी पध्दत आत्मसात केली. मांजरीशी खेळताना तिच्या पाठीवर हेलनची बोटे फिरवून ॲनने C-A-T (कॅट) ही अक्षरे काढली. C-A-K-E (केक) म्हणजे खाण्याचा चविष्ट पदार्थ तर दुध पिताना M-I-L-K (मिल्क) ही अक्षरे शिकवली. आपण शब्द शिकतो आहोत हे मात्र हेलनच्या गावीही नव्हते.

हेलनचे मिस ॲनबरोबरचे दिवस अदभुतरम्य होते. हेलनला ॲनने दिलेले सुई, दोरा, मणी ह्याचे खेळ आवडायचे. तिच्याबरोबर जंगलात चालायला किंवा घोड्यावर रपेट मारायला हेलनला खूप मजा यायची. पण मिस ॲन अतिशय शिस्तप्रिय होती. हेलनचे पूर्वीसारखे टेबलाभोवती फिरत कुठल्याही ताटलीतून कसेही घास कोंबून जेवणे तिने पूर्ण बंद केले. त्याऐवजी एकाच ठिकाणी खुर्चीत बसून मांडीवर व्यवस्थित रुमाल अंथरून चमच्याचे जेवायचे अशी ताकीद दिली. अशा नियमांचा हेलनला खूप राग यायचा. त्यामुळे ती मिस ॲनला कधी कधी मारायची. एकदा तर तिने मिस ॲनला एका खोलीत कोंडले आणि त्या खोलीची चावी लपवून ठेवली.

एके दिवशी दोघी पाण्याच्या पंपापाशी थांबल्या. ॲनने पंप ओढला आणि हेलनला नळाखाली हात पकडायला सांगितले. ॲनने तिचा दुसरा हात हातात घेतला आणि W-A-T-E-R (वॉटर) ही अक्षरे काढली. अचानक हेलनचा चेहरा उजळला. तिने स्वतः W-A-T-E-R ची अक्षरे अनेकवेळा काढून बघितली. ॲनने जमिनीला हात लावला आणि G-R-O-U-N-D (ग्राऊंड)ही अक्षरे काढली. अचानक हेलनला उमगले की जी अक्षरे ती गिरवत होती ते शब्द आहेत आणि ते शब्द म्हणजे एखादी वस्तू, प्राणी, माणूस किंवा अन्य काहीतरी आहे. तिने ॲनकडे बोट दाखवले आणि ॲनने अक्षरे लिहिली T-E-A-C-H-E-R (टीचर)जे ॲनचे नवीन नाव बनले. त्या रात्री हेलनने पहिल्यांदा ॲनच्या गालावर आनंदाने ओठ टेकवले.

नंतर ॲनने हेलनला ब्रेल लिपी शिकवली म्हणजेच कागदावर टिंबापासून बनवलेल्या अक्षरांवर बोटे फिरवून कसे वाचायचे ते शिकवले. जसजशी हेलन नवनवीन गोष्टी शिकू लागली, तिचा स्वतःवर ताबा आला. ती कपडे घालणे, बिछाना तयार करणे, खेळणी उचलणे अशी स्वतःची काही कामे स्वतः करु लागली. हळूहळू ती बोलायलाही शिकली. अर्थात खूप सावकाश आणि प्रयत्न करूनच तिला बोलायला जमत होते. ती आपली बोटे बोलत असणाऱ्या व्यक्तीच्या ओठांवर ठेवायची आणि त्याच्या ओठांचा आकार आणि हालचालींचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करायची.

हेलनला आता न्यूयॉर्कच्या राईट-हुमासन शाळेत तसेच केंब्रिज मुलींच्या शाळेत एक आदर्श विद्यार्थिनी म्हणून सगळे ओळखू लागले. खूप प्रयत्न केल्यावर १९०० साली एकदाचा तिला रेडक्लीफ्फ महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळाला. मिस ॲन तिच्या शेजारी बसायची आणि प्रोफेसर जे शिकवायचे ते हेलनच्या हातावर लिहायची. इंग्लिश तिचा सगळ्यात आवडता विषय होता. तिने लिहिलेल्या अनेक लेखांना प्रसिध्दी मिळाली. एका मासिकाने तिचा जीवन प्रवास लिहिण्यासाठी मानधनाचा प्रस्ताव ठेवला. रेडक्लीफ्फमधील शिक्षण १९०४ मध्ये पूर्ण झाल्यावर हेलन आणि ॲन बॉस्टनजवळील रेन्थम शहरात राहू लागल्या. दरम्यान ॲनचे लग्न जॉन मेसीशी झाले. तो हेलनचा रेडक्लीफ्फ कॉलेजमधला शिक्षक होता. आता तिघेही एकत्र राहू लागले.

हेलनने अंध आणि बहिऱ्या लोकांना व्याख्याने द्यायला सुरुवात केली. तिच्या प्रयत्नांमुळे अंध आणि बहिऱ्या लोकांना शिक्षण देणाऱ्या अनेक संस्था स्थापन झाल्या. जास्तीत जास्त पुस्तके ब्रेलमध्ये प्रकाशित करणे हे तिचे ध्येय बनले होते. तिच्या अथक परिश्रमातून राष्ट्रीय अंध पुस्तकालयाची स्थापना झाली.

अमेरिकन फाऊंडेशन फॉर द ब्लाईंड स्थापन झाल्यावर हेलनने जोमाने आपले कार्य तिकडे चालू केले. लवकरच हेलनची आई वारली आणि पाठोपाठ ॲनचाही मृत्यु झाला. दोघींच्या जाण्याने हेलन पार खचून गेली.

तरीही तिचे काम जोरात चालूच होते. १९४१ मध्ये दुसऱ्या महायुद्धात अमेरिका सहभागी झाली तेव्हा राष्ट्राध्यक्ष फँकलिन रूझवेल्टनी तिला युद्धात दृष्टी गमावलेल्या सैनिकांसाठी काम करण्याची विनंती केली. संयुक्त राष्ट्र संघाने सुरु केलेल्या “हेलन केलर विश्व अभियान” बद्दल तिला स्वतःचा अभिमान वाटला. त्यामुळे आता अनेक देशातल्या अंध आणि बहिऱ्या मुलांना मदत मिळेल असे तिला वाटले. १९६८ मध्ये हेलन केलरचे निधन झाले, तोपर्यंत आत्मसन्मान आणि शिक्षणाची तिची तळमळ आणि चळवळ जगभरात फोफावली होती.

एलेनॉर रूझवेल्ट
(१८८४ – १९६२)

***“अखेर वैश्विक अधिकारांची सुरुवात होते तरी केव्हा?
जेव्हा छोट्या छोट्या जागी, आपल्या घराच्या आजूबाजूला प्रत्येक व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्यात... प्रत्येक पुरुष, स्त्री आणि मुले मागणी करतात समान न्याय, समान संधी आणि भेदाभेद नसलेल्या आत्मसन्मानाची...”***

-एलेनॉर रूझवेल्टने संयुक्त राष्ट्र सभेमध्ये केलेल्या भाषणामधून

आजीबाई! एलेनॉरची सुंदर आई तिला ह्याच नावाने हाक मारे. एलेनॉर होतीही तशीच....गंभीर आणि लाजाळू. आई एलेनॉरवर बरेच वेळा नाराज असायची. ती एलेनॉरला म्हणायची, “तू दिसायला चांगली नाहीस तर निदान व्यवस्थित राहण्याचा-वागण्याचा प्रयत्न कर.” एलेनॉरला आपले प्रेमळ बाबा मात्र खूप आवडत. पण कधीकधी बाबांचे वागणे तिला विचित्र वाटे. आपले बाबा दारूडे आहेत हे काही वर्षांनी एलेनॉरला कळाले. दारूच्या नशेत ते काहीही बरळत, वेड्यासारखे वागत. तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी आईबाबा आणि छोटा भाऊ देवाघरी गेले.

त्यानंतर एलेनॉर आणि तिच्या मोठ्या भावाला हॉलआजीने वाढवले. एलेनॉर आपल्या तुसड्या आजीला खुश ठेवण्याचा खूप प्रयत्न करे पण आजीला काही तिच्याबद्दल फार ओलावा नव्हता. इंग्लंडमधील ॲलन्सवूडच्या मुलींच्या शाळेत प्रवेश घेतल्यावर तिला आजीपासून सुटका झाल्यासारखी वाटली. इंग्लंडमधील तिचे दिवस आनंदात गेले. शाळेच्या संचालक मॅडेमोझाल सूवेस्टर तिला समजून घेत आणि प्रोत्साहन देत. तिथे तिला खूप मैत्रिणी मिळाल्या. अमेरिकेत ती परतली तो एक नवा आत्मविश्वास घेऊनच.

काहीही न करता आरामात आयुष्य जाईल इतकी गडगंज संपत्ती एलेनॉरला आपल्या पूर्वजांकडून मिळाली. परंतु ज्यातून समाधान मिळेल असे काम करायचे तिच्या मनात पक्के होते. त्यामुळे न्यूयॉर्कच्या एका गरीब वस्तीतील शाळेत बिनपगारी शिक्षकाची नोकरी तिने पकडली. तिचे दूरचे नातेवाईक फ्रँकलिन ह्यांना हे जेव्हा समजले तेव्हा एलेनॉरबद्दल त्यांना कुतूहल वाटले. हळूहळू दोघांमधील मैत्री वाढली आणि फ्रँकलिनने एलेनॉरला लग्नाची मागणी घातली.

लग्नानंतरचे दिवस खूप व्यस्त होते. दहा वर्षात एलेनॉरला सहा मुले झाली. त्यातील एक बाळ लगेचच दगावले. एलेनॉर सतत कामात असे. मुलांचे पालन पोषण आणि नवऱ्याच्या व्यवसायात मदत ह्यात ती पार गुंतून गेली होती. फँकलिननी कायद्याचे शिक्षण घेतले आणि न्युयॉर्कचे सिनेटर म्हणून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरवात केली. नंतर राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सननी त्यांची नेमणूक नौसेनेचे सहायक सचिव म्हणून केली आणि रूझवेल्ट कुटुंब वॉशिंग्टन डी.सी. ला राहायला आले.

वॉशिंग्टनला आल्यावर एलेनॉरच्या नव्या आयुष्याची सुरुवात झाली. पहिल्या महायुध्यात तिची रेडक्रॉस संस्थेमध्ये संचालक म्हणून नेमणूक झाली. रेडक्रॉस संस्था हजारो सैनिकांच्या खाण्या-पिण्याची काळजी घेत असे. युद्ध संपल्यावर तिने महिला मताधिकार संस्थेमध्ये काम केले आणि महिलांच्या कायद्याबद्दल लेखन केले. १९२१ मध्ये तिच्या पतीला पोलिओने अपंगत्व आले. एलेनॉरने त्याची खूप सेवा केली पण पोलिओने फँकलिनचे दोन्ही पाय निकामी झाले आणि पायांना धातूचे ब्रेसेस लावावे लागले. तिच्या सासूबाईंना वाटे की फँकलिनने राजकारण सोडून घरी आराम करावा. फँकलिनच्या राजकीय महत्त्वाकांक्षेला तिने प्रसंगी सासूच्या विरुद्ध जाऊन प्रोत्साहन दिले.

लोकांच्या मनात फँकलिनची उत्तम प्रतिमा ठसावी यासाठी एलेनॉर पतीच्या कामाबद्दलची भाषणे महिला मतदाराच्या मेळाव्यात देऊ लागली. तिच्या मेहनतीला यश मिळाले आणि फँकलिन न्युयॉर्कच्या गव्हर्नरपदी निवडून आले. एलेनॉर तुरुंगांना आणि वेड्यांच्या इस्पितळाना भेटी देऊन यायची आणि तिथल्या परिस्थितीचा वृत्तांत फँकलिनला द्यायची. ती जणू काही फँकलिनचे 'पाय' बनली होती. त्याचबरोबर ती एका मुलींच्या शाळेत आठवड्यातले काही दिवस शिकवायला जात असे. त्या शाळेची ती संस्थापक सदस्यही होती. १९३२ मध्ये फँकलिन रुझवेल्ट राष्ट्राध्यक्ष झाले तेव्हा आपली ही सामाजिक कार्ये सोडावी लागतील म्हणून तिला थोडे वाईट वाटले. ती राजधानीत आली. सळसळता उत्साह, बुद्धिमत्ता, नैतिकता, कनवाळू वृत्ती अशा अनेक गुणांनी संपन्न अशी राष्ट्राची प्रथम महिला आतापर्यंत राष्ट्राने कधी पहिली नव्हती.

एखाद्या कुशल योद्ध्याप्रमाणे ती सरकारी कामाचे परीक्षण करण्यासाठी हजारो मैलाचा प्रवास करे. आणि पतीच्या कामासाठी उपयोग व्हावा ह्यासाठी त्या भेटीवर वृत्तांत तयार करे. गरीब, वंचित आणि शोषित लोकांच्या अधिकारासाठी तिने खूप काम केले. त्यांच्या प्रश्नांना वाचा देण्यासाठी ठिकठिकाणी जाऊन तिने भाषणे केली. वर्तमानपत्रे, रेडिओ अशा माध्यमातून अमेरिकेच्या कानाकोपऱ्यापर्यंत तिने त्यांच्या समस्या पोचवल्या.

वर्णभेदाने ग्रासलेल्या दक्षिण भागात जेव्हा ती एका कॉन्फरन्ससाठी गेली होती तेव्हा काळे-गोरे एकत्र बसू शकत नाहीत असे तिला सांगितले गेले. तिने सरळ आपली खुर्ची उचलली आणि काळ्या लोकांमध्ये जाऊन बसली. हा नियमभंग आहे असे पोलिसांनी सांगितल्यावर ती काळे आणि गोरे ह्यांच्या मधोमध बसली.

फँकलिनच्या मृत्युनंतरही तिने आपले काम सुरूच ठेवले. राष्ट्राध्यक्ष हरी ट्रुमॅननी तिला अमेरिकेकडून संयुक्त राष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी प्रेरित केले. कारण तिच्या प्रयत्नामुळेच तर संयुक्त राष्ट्र संघाने वैश्विक मानवाधिकाराची अधिसूचना अमलात आणली होती. १९५३ मध्ये संयुक्त राष्ट्र संघातून निवृत्त झाल्यानंतरही एलेनॉर आपल्या भाषणातून विश्वशांतीचा संदेश देण्यासाठी ठिकठिकाणी प्रवास करत होती. राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडीनी शांतीवाहिनीच्या राष्ट्रीय सल्लागार समितीची सदस्य म्हणून तिची नियुक्ती केली तसेच राष्ट्रपतींच्या महिला आयोगाची प्रमुख म्हणूनही तिची नेमणूक केली. मानव कल्याणाच्या बहुमूल्य कार्याबद्दल एलेनॉरला अनेक पुरस्कार मिळाले. तिच्या मृत्युनंतर तिच्या एका समर्थकाने म्हटले आहे की "अंधाराला दोष देत न बसता तिने छोटीशी पणती लावली आणि त्या दिव्याच्या प्रकाशाने सारे जग उजळून निघाले."

अॅमेलिया इयरहार्ट
(१८९७-१९३७)

“महिलांनीसुद्धा पुरुषांप्रमाणे वेगवेगळ्या गोष्टी करून पाहिल्या पाहिजेत. कदाचित त्यांचे प्रयत्न अपुरे पडतील. पण इतरांनी या अपयशाकडे एक आव्हान म्हणून बघितले पाहिजे.”

-जगप्रदक्षिणा घालण्याच्या शेवटच्या प्रयत्नाआधी अॅमेलिया इयरहार्टने आपल्या पतीला लिहिलेल्या पत्रातून

२० व्या शतकाच्या सुरुवातीला पळणे, उड्या मारणे, मैदानी खेळ खेळणे या मुलीच्या जातीला शोभणाऱ्या गोष्टी नाहीत असे मानले जाई. पण पक्की टॉमबॉय असलेल्या अॅमेलिया मेरी इयरहार्टने अशा गोष्टींची कधीच पर्वा केली नाही. तिला सगळे लाडाने मिली म्हणत. मिली बाहुल्यांसोबत कधीच खेळली नाही. तिला मुलांसारखे मैदानी खेळच खेळायला आवडायचे. गोष्टीच्या पुस्तकांमधेही तिला साहसकथाच आवडत. साहसी मुलांच्या वेगवेगळ्या करामती ती भान हरपून वाचे. गोष्टीतल्या मुली मात्र अशी धमाल का करत नाहीत असा तिला नेहमी प्रश्न पडे. कारण ती आणि तिची लहान बहिण म्युरियल खूप मस्ती करत. त्यांचे आई-बाबा अॅमी आणि एडविन खूप प्रेमळ होते. त्यांनी आपल्या मुलींना एकदम मोकळ्या वातावरणात वाढवले. एकदा मिली आपल्या आजोळी गेली होती तेव्हा तिने आपल्या भावंडांसोबत घरामागच्या अंगणात एक रोलर-कोस्टर बनवले. या झोक्याची पहिली प्रवासी अर्थात मिलीच होती.

मिलीला अभ्यासात चांगली गती होती. पदवीनंतर आता पुढे काय करायचे हे अजून ठरत नव्हते. १९१७ चा नाताळ साजरा करण्यासाठी ती टोरोंटोमध्ये शिकणाऱ्या म्युरियलकडे गेली. अमेरिका काही महिन्यांपूर्वीच पहिल्या महायुद्धात ओढली गेली असली तरी कॅनडामध्ये मात्र १९१४ पासूनच युद्धाचे वारे वाहू लागले होते. युद्धात होरपळलेले जखमी सैनिक पाहून अॅमेलियाचे हृदय कळवळले. सैनिकांची सुश्रुषा करण्यासाठी ती नर्स म्हणून इस्पितळात भरती झाली. आपण वैद्यकीय क्षेत्रात जावे असे तिला वाटू लागले. लॉस एंजलिसमध्ये राहणारे तिचे आई-वडील त्यावेळी खूप वैयक्तिक अडचणींचा सामना करत होते. अॅमेलियाने आपल्या पालकांच्या मदतीसाठी तडक लॉस एंजलिसला धाव घेतली.

कॅलिफोर्नियामध्ये विमानांच्या प्रात्यक्षिकांनी अॅमेलियाचे लक्ष वेधून घेतले. युध्दकाळातील वैमानिक आता नागरी सेवांमध्ये पैसे मिळवण्याच्या संधी शोधू लागले होते. ते विमान चालवण्याचे प्रशिक्षण देत आणि साहसी प्रात्यक्षिकेही करून दाखवत. अॅमेलियाच्या वडिलांनी एकदा विमानातून एक फेरफटका मारण्याची व्यवस्था केली. त्या अनुभवानंतर अॅमेलियाने विमान उडवण्याचे विधिवत प्रशिक्षण घेण्याचा निश्चय केला. तिने लगेच प्रशिक्षण वर्गात आपले नाव नोंदवले आणि

प्रशिक्षण शुल्क भरण्यासाठी एका टेलिफोन कंपनीमध्ये नोकरी धरली. लवकरच ॲमेलियाला वैमानिकाचे प्रमाणपत्र मिळाले. सतत विमानातून भरारी घ्यावी असे तिला वाटे. आता ती वैमानिकासारखा खाकी पॅन्ट, लेदर जॅकेट , हेल्मेट आणि गॉगल असा पोशाख घालू लागली. १९२१ मध्ये तिने स्वतःचे खासगी विमानही विकत घेतले.

पण या क्षेत्रात अजूनही पुरुषांचेच वर्चस्व होते. ॲमी फिप्प्स गेस्ट नावाच्या एका श्रीमंत महिलेने मात्र हे चित्र बदलण्याचा निश्चय केला. १९२७ मध्ये चार्ल्स लिंडबर्ग नावाच्या वैमानिकाने एकट्याने विना थांबा अटलांटिक समुद्र पार करण्याचा विक्रम केला होता. चार्ल्स लिंडबर्गच्या पराक्रमाने प्रभावित झालेल्या मिसेस गेस्टने त्याच्याच पावलावर पाउल ठेवत एक धाडसी मोहीम आखली. तिच्या कुटुंबियांनी मात्र याला ठाम विरोध केला. नाईलाजाने माघार घ्यावी लागल्याने मिसेस गेस्टने ही मोहीम मग ॲमेलियावर सोपवली.

कॅप्टन ॲमेलियाने आपली भूमिका चोख बजावली. पटापट निर्णय घेतले. पण तिला अशा मोहिमांचा फारसा अनुभव नसल्याने विमान उडवण्याचे मुख्य काम तिचा सहकारी पायलट बिल स्टल्टझनेच केले. १७ जून १९२८ रोजी ॲमेलिया, बिल आणि मेकॅनिक लुई गॉर्डन यांनी न्यूफाउंडलॅन्डमधून फ्रेंडशिप नामक विमानाने उड्डाण केले. वीस तास आणि चाळीस मिनिटांनी वेल्स मध्ये विमान सुखरूप उतरले. या पराक्रमाला लोकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. ॲमेलियाला खूप प्रसिद्धी मिळाली. सर्वत्र जल्लोष झाला. ज्यांनी या मोहिमेत फार महत्त्वाची भूमिका बजावली होती ते बिल आणि लुई मात्र या जल्लोषात मागेच राहिले याची तिला खूप खंत वाटली. त्याच दिवशी ॲमेलियाने संकल्प सोडला, एकटी विमानाने अटलांटिक समुद्र पार करून दाखवेन!

फ्रेंडशिपच्या मोहिमेनंतर ॲमेलियाने, जिला आता एई म्हणून ओळखले जाई, विमान उड्डाणाबद्दल लिहायला आणि व्याखाने द्यायला सुरुवात केली. तिने विमेन्स एअर डर्बी या स्पर्धेत भाग घेतला आणि एक विमान कंपनी सुरु करायला देखील हातभार लावला. पण पुन्हा आकाशात भरारी घेण्यासाठी तिचे मन आसुसले होते. दरम्यान तिचे जॉर्ज पुत्नाम नावाच्या संपादकाशी लग्न झाले. तिच्या अटलांटिक पार करण्याच्या स्वप्नाबद्दल जेव्हा तिने जॉर्जला सांगितले तेव्हा त्याने तिला खूप प्रोत्साहन दिले.

एईने तयारीला सुरुवात केली. लॉकहीड वेगा या तिच्या खासगी विमानाला समुद्रापार घेऊन जाण्यासाठी खूपच सरावाची गरज होती. खिडकीतून खाली न बघता फक्त कॉकपिट मधील उपकरणांवर नजर ठेवत विमान उडवण्याचा तिने कसून सराव केला. अखेर २१ मे १९३२ रोजी तिने हार्बर ग्रेस, न्यूफाउंडलँड येथून उड्डाण केले आणि एका ऐतिहासिक मोहिमेचा शुभारंभ झाला.

सुरुवातीचा प्रवास चांगला झाला. पण हळूहळू काही तांत्रिक अडचणी उद्भवू लागल्या. कॉकपिटमधील काही उपकरणे नीट काम करत नव्हती. समुद्रापासून किती उंचीवर आपण विमान उडवत आहोत याचा थांगपत्ता लागत नसताना एईने दाट धुके आणि काळोखातून कशीबशी वाट काढत पहिला टप्पा पार केला. पण हवामान आणखीनच बिघडत चालले होते. एईचे विमान तुफानात सापडले. पाऊस आणि वाऱ्याने तिला झोडपून काढले. लॉकहीड वेगामधली आणखी काही उपकरणे बिघडली. पण एई डगमगली नाही. तिने प्रवास चालूच ठेवला आणि आयर्लंड मध्ये सुखरूप विमान उतरवले. एईने पंधरा तासांच्या आत अटलांटिक समुद्र पार करून दाखवला! या विक्रमी मोहिमेने तिला अमाप प्रसिद्धी मिळाली. पुढचे बरेच दिवस तिला लंडन, रोम आणि पॅरिसमधून विविध राजघराण्यांना आणि आंतरराष्ट्रीय मान्यवरांना भेटण्यासाठी आमंत्रणे येत होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष हर्बर्ट हूवर यांना भेटण्याचा बहुमानही तिला मिळाला.

१९३५ मध्ये एईने दोन इंजिने असलेले लॉकहीड इलेक्ट्रा नावाचे विमान विकत घेतले. आता तिने वैमानिक जगतातील सर्वात मोठे आव्हान पेलण्याचा निश्चय केला, विषुववृत्तावरून पृथ्वीला प्रदक्षिणा घालणे! विषुववृत्ताच्या उत्तरेकडच्या बाजूने प्रदक्षिणा घालण्याचा पराक्रम पूर्वी केला गेला होता. पण कुठल्याही महिला वैमानिकाने मात्र ही कामगिरी आजतागायत केली नव्हती.

ॲमेलिया आणि जॉर्ज अनेक महिने तयारी करत होते. त्यांनी नकाशांचा आणि हवामानाचा अभ्यास केला. ॲमेलियाने फ्रेड नूननला आपला सहकारी म्हणून निवडले. त्यांचा उड्डाणाचा पहिला प्रयत्न फसला. १ जून १९३७ रोजी त्यांनी यशस्वी उड्डाण केले. न्यू गिनी ते प्रशांत महासागरातील होवलँड बेट हा प्रवासातला सर्वात प्रदीर्घ आणि खडतर टप्पा होता. २,५५६ मैलांचा हा टप्पा पार करताना विमान भरकटले. इयरहार्ट आणि नूनन क्षणार्धात गायब झाले. त्यांचा आणि त्यांच्या विमानाचा पुन्हा कधीच थांगपत्ता लागला नाही.

लोकांना नेहमीच प्रश्न पडतो, असे काय अघटीत घडले असेल त्या दिवशी? विमानातले इंधन संपल्यामुळे ते समुद्रात कोसळले असेल का? या प्रश्नांची उत्तरे कदाचित आपल्याला कधीच मिळणार नाहीत. पण फ्रेंडशिप मोहिमेच्या खूप आधी वडिलांना लिहिलेल्या पत्रातले हे शब्द ॲमेलियाच्या जीवनाचे सार सांगून जातात. 'ही मोहीम मी फत्ते करू शकले असते तर मला खूप आनंद झाला असता. पण मी हरले याचे दुःख नाही. या रोमांचकारी मोहिमेचा मी भाग होऊ शकले हीच खूप आनंदाची गोष्ट आहे.'

मार्गरेट मीड
(१९०१-१९७८)

"माझ्या मते कुणा व्यक्तीने मानवजातीसाठी केलेले योगदान हाच त्याच्या यशाचा मापदंड आहे."

- मार्गारेट मीडने रेडबुक मासिकात लिहिलेल्या लेखामधून

मार्गारेटला मानववंशशास्त्रज्ञासारखा विचार करायला सर्वात प्रथम मीडआजीने प्रोत्साहित केले. आजी तिला आपल्या धाकट्या बहिणी एलिझाबेथ आणि प्रिसिल्ला ह्यांच्या वर्तणूकीचे निरीक्षण करून त्यावर टिपण लिहायला सांगे. मार्गारेटने त्या दोघी जे बोलायच्या किंवा करायच्या त्याच्या नोंदी केल्या. त्या नोंदीत असे टिपले गेले की त्यांच्या काही गोष्टी खूप भिन्न होत्या तर काही अगदी सारख्या. एक मानववंशशास्त्रज्ञ म्हणून आपली वाटचाल सुरु झाली आहे ह्याची तेव्हा तिला मुळीच कल्पना नव्हती. व्यक्तीचे शारीरिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पैलू सखोल निरीक्षणातून अभ्यासायची मुहूर्तमेढ तिच्या घरातच रोवली गेली होती.

मार्गारेट पाच भावंडांमध्ये सर्वात मोठी. मीडआजी आणि आईने मुलांना पहिली काही वर्षे घरीच शिकवले. आजीचे ठाम मत होते की मुलांनी एका वेळी एका जागी बसून फारतर तासभर अभ्यास करावा. घोकंपट्टीला तिचा सक्त विरोध होता. त्याऐवजी धड्यात असलेल्या वनस्पतीची पाने ती मार्गारेटला आपल्या बागेतून घेऊन यायला सांगे. मार्गारेटच्या आईला वाटे की मुलांनी प्रत्यक्ष हाताने काम करावे. म्हणून मुलांना तिने सुतारकाम, बास्केट बनवणे, विणकाम तसेच लाकडांचे कोरीव काम शिकवले. मार्गारेटचे वडील प्राध्यापक असल्याने मार्गारेट लहान असताना त्यांची अनेकवेळा बदली होत असे. तिच्या किशोरवयापर्यंत त्यांनी जवळपास साठ घरे बदलली होती! सततच्या बदलामुळे कुठल्याही ठिकाणी लगेचच जुळवून घेण्याची सवय तिला मोठेपणी चांगलीच उपयोगी पडली.

मार्गारेटने न्यूयार्कच्या बर्नाड कॉलेजमधून पदवी आणि कोलंबिया विद्यापीठातून मानववंशशास्त्रात डॉक्टरेट मिळवली. त्यानंतर ती नऊ हजार किलोमीटरचा प्रवास करून पूर्व ऑस्ट्रेलियामधील दक्षिण समृद्रातील अमेरिकन सामाऊ नावाच्या एका बेटावर गेली.

चोवीस वर्षाच्या मुलीने एकटीने एवढा प्रवास करून जाणे लोकांसाठी जरा धक्कादायक होते परंतु मीड कुटुंबाला तिचा खूप अभिमान होता. ती पोलिनेसिअॅन संस्कृतीचा अभ्यास करत होती आणि त्यासंदर्भात ह्या बेटावर तिला चांगली माहिती मिळणार होती. इथे आल्यावर तिने स्थानिक जीवनाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करत निरीक्षण व नोंदी करण्याचे आपले काम सुरू केले. मार्गारेट ताऊ बेटावरील एका खेड्यामध्ये जवळपास वर्षभर राहिली. तिने तिथल्या बारा ते एकोणीस ह्या किशोरवयीन वयोगटातील मुलींचा अभ्यास केला. तिथले अनुभव आणि निष्कर्ष तिने “कमिंग ऑफ एज इन सामोआ” ह्या लोकप्रिय पुस्तकात संकलित केले.

किशोरावस्थेचा सखोल अभ्यास करण्यासाठी मुलांबरोबर काम करणे गरजेचे होते. त्यासाठी ती आणि न्यूझीलंडमधील मानववंशशास्त्रज्ञ रिओ फॉर्च्यून पॅसिफिक समुद्रातील न्यू गिनी बेटावर गेले. तिला वाटले की चित्र हे माध्यम मुलांसाठी वापरावे कारण चित्रातून मुले जास्त व्यक्त होतात. ती कागदांचे हजारो गठ्ठे घेऊन गेली होती. मुलांनी ते महिनाभरात संपवले. न्यू गिनीहून परतताना तिच्याकडे मुलांनी काढलेली तब्बल पस्तीस हजार चित्रे जमा झाली होती. त्यासुमारास तिचा ल्यूथर क्रेसमॅनशी घटस्फोट झाला आणि रिओ फॉर्च्यूनशी विवाह झाला.

ज्या ज्या ठिकाणी ती जाई त्या त्या ठिकाणी ती तिथली भाषा शिकून घ्यायची. तसेच अभ्यासाबरोबरच तिथल्या लोकांचा धर्म, रूढी परंपरा, सामाजिक जीवन हेही समजून घ्यायची. माहिती संकलनासाठी तिने निरीक्षणे, मुलाखती, फोटो यांच्या मदतीने नवीन पद्धत विकसित केली जी भविष्यातील मानववंशशास्त्रज्ञांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार होती.तिच्या कामासाठी संवेदनशीलता आणि कौशल्य महत्वाचे होते. मार्गारेटला योग्य माणसे निवडून योग्य प्रश्न विचारावे लागत. तसेच त्यांच्या हावभावावरून न बोललेल्या गोष्टीही चाणाक्षपणे जाणून घ्याव्या लागत. प्रत्येक फोटोवर नाव आणि तारीख लिहून ठेवावी लागे. तसेच गोळा केलेल्या वस्तू – दागिने, खेळणी, भांडी, हत्यारे, कोरीव वस्तू, कपडे ह्या ओळखून त्यावरही लेबल लावावे लागे.

मार्गारेटचे हे मानववंशशास्त्रातील बहुमूल्य संशोधन अनेक दशके चालू होते. तिने न्यू गिनी आणि बालीला अनेक वेळा भेट दिली. तिथले अनुभव आणि संशोधन ह्यावर अनेक पुस्तके लिहिली. बालीला तिची ओळख इंग्रज मानववंशशास्त्रज्ञ ग्रेगरी बॅटमॅनशी झाली. दरम्यान ती रिओ फॉर्च्यूनशी विभक्त झाली होती. तिने ग्रेगरीसोबत लग्न केले. १९३० सालच्या अखेरीस दुसऱ्या महायुद्ध्याच्या भीतीमुळे ती अमेरिकेतून बाहेर पडली नाही. त्या काळात तिने न्यूयार्कमधील नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये काम केले. १९३९ मध्ये तिने मेरी कॅथेरीन ह्या गोड बाळाला जन्म दिला. इतकी वर्षे लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये काम करणारी मार्गारेट आता स्वतः आई झाली होती.

मार्गारेटने प्रवास केलेल्या काही अभ्यासस्थळांवर पाणी आणि विजेचेही दुर्भिक्ष असे. त्यामुळे काही वर्षानंतर असे अभ्यासदौरे तिला अवघड वाटू लागले. ती आता कोलंबिया विद्यापीठात मानववंशशास्त्र हा विषय शिकवण्यासाठी आपला वेळ देऊ लागली. तिच्या घोट्याला दुखापत झाली तेव्हा कुबड्या न वापरता तिने चेरीच्या झाडाची एक काठी बनवून घेतली. आधारासाठी काठीच्या वरच्या टोकाला वाय आकार दिला. तिचा घोटा बरा झाल्यावरही काठीचा वापर घेऊनच ती चालत असे. ती काठी आणि लाल रंगाची टोपी ही पुढे तिची ओळख बनली.

आपल्या छोट्या बहिणींचे निरीक्षण करून टिपणे काढणारी लहान मुलगी ते एक प्रख्यात मानववंशशास्त्रज्ञ असा मार्गारेटचा प्रवास विलक्षण वेधक होता. कुटुंबपध्दती आणि मानवी नात्यांवरील तिच्या सखोल अभ्यासाने जगाला एक नवा दृष्टीकोन दिला. माणसांना माणसांपासून तोडणाऱ्या भेदांपेक्षा त्यांना जोडणाऱ्या साम्यस्थळांवर लक्ष केंद्रित करायला तिने जगाला शिकवले. तिला आशा होती की कधी ना कधी लोक आपल्या मुलांना असे वाढवतील की त्या मुलांना जगात कुठल्याही जागी घरच्यासारखे वाटेल, तिथले अन्न ती आवडीने खातील, तिथली नवीन भाषा शिकतील. त्यांना बदलांची भीती वाटणार नाही. आपली जागा सोडून दुसरीकडे जाताना त्यांना उदास वाटेल, त्या जागी ते अगदी मोजकेच दिवस राहिले असतील तरीसुद्धा. पण क्षणभरच. कारण नवीन बदलांना सामोरे जायला ती नेहमीच उत्सुक असतील. सतत नवीन आव्हाने स्वीकारणे आणि आनंदाने पुढे जाणे हेच तर मार्गारेटचे वैशिष्ट्य होते.

समाप्त